Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – VI April 2016

# किशोरावस्थेतील विद्यार्थ्यांच्या विविध शैक्षणिक गरजांचा अभ्यास

**प्राचार्य डॉ. डी. ए. सूर्यवंशी,**
**आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय,**
**शिरपूर.**

**प्रास्ताविक :**

एलिझाबेथ हरलॉक यांनी व्यक्ती विकासाच्या महत्त्वपूर्ण अवस्था सांगितलेल्या आहेत. वय वर्षे 12 ते 18 हा मुलांच्या जीवनातला महत्वपूर्ण कालखंड मानला जातो. या कालखंडात किशोरांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक, वर्तनात, बदल होऊन विविध प्रकारच्या समस्या निर्माण होत असतात. शारीरिक विकासाच्या परिपक्वतेमुळे किशोर किशोरी या काळात गोंधळून जातात. याच काळात ताणतणाव व वादळयुक्त परिस्थितीची चाहूल निर्माण होते.

किशोरांचा विकास विविध क्षेत्रात झपाट्याने होऊन अनुभवाचे क्षेत्र व्यापक बनत असते. किशोरांना शाळेच्या उपक्रमाद्वारे शारीरिक, मानसिक, भावनिक विकासाला संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. अंगी अनुभव वाढीस लागल्याने अवधानाची कक्षा सुध्दा वाढीस लागत असते. किशोरांना प्रभावी परिणामकारक व समृध्द अनुभव मिळण्यासाठी विविध अभ्यासपूरक उपक्रमाचे आयोजन जाणीवपुर्वक करणे गरजेचे आहे.

**संशोधन शीर्षक :**

धुळे जिल्ह्यातील माध्यमिक शाळांमधील किशोरवस्थेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांचा अभ्यास.

**संशोधनाची गरज :**

किशोरावस्था या कालखंडातील मुले शाळेत दाखल झालेली असतात भारतीय राज्यघटनेच्या कलम 45 नुसार वय वर्षे 14 पर्यंतच्या मुलांना सक्तीचे सार्वत्रिक व मोफत शिक्षण द्यावे अशी तरतुद आहे. त्यामुळे किशोरावस्थेतील मुलांच्या शिक्षणाबाबत विचार होणे गरजेचे आहे. किशोरावस्थेतील मुलांना विविध प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागत असल्यामुळे विविध उपक्रमांद्वारे त्यांच्या समस्या सोडविणे ही शालेय स्तरावरील शिक्षणाची जबाबदारी दिसून येते. शिक्षणातील विद्यार्थ्यांबरोबरच महत्त्वाचा घटक शिक्षक होय आणि शिक्षकाला योग्य प्रशिक्षण द्यावयाची जबाबदारी शिक्षक -प्रशिक्षण महाविद्यालयाची असते. प्रस्तुत समस्येचा संबंध शिक्षक व प्रशिक्षकांशी आहे म्हणून वरील समस्येचा विचार करुन संबंधित संशोधन कार्याची गरज भासते.

**संशोधनाचे महत्त्व :**

किशोरावस्थेतील मुलांच्या विविध प्रकारच्या समस्या असतात. या समस्यांचा प्रतिकूल परिणाम त्यांच्या व्यक्तिगत विकासावर होत असतो. विशेषत: किशोरावस्थेतील मुलांचा या कालखंडात शैक्षणिक विकासावर परिणाम होतो. किशोरांच्या समस्या योग्य वेळी शोधून त्यावर योग्यवेळी उपाययोजना करता येतात. किशोरावस्थेतील मुलांच्या विकासासाठी शाळेमार्फत कोणकोणत्या उपक्रमांचे आयोजन करता येईल हे पाहणे आवश्यक वाटल्याने किशोरावस्थेतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासंबंधीच्या गरजांचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. किशोरावस्थेतील मुलांच्या शारीरिक, भावनिक, सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.
2. किशोरावस्थेतील मुलांकरिता विविध उपक्रम सुचविणे.
3. किशोरावस्थेतील समस्यांवर उपाय सुचविणे.

**संशोधन पध्दती :**

संशोधनाच्या अनेक पध्दती आहेत. संशोधनाची उद्दिष्टे, माहिती संकलन, माहिती संकलनाचे तंत्र, नियंत्रण तंत्रे, साधने, क्षेत्र यासारख्या घटकांवर संशोधन पध्दतीचे वर्गीकरण केले जाते.

प्रस्तुत समस्या वर्तमान काळाशी निगडीत आहे. समस्येचे स्वरुप पाहता व काळाची मर्यादा विचारात घेता वर्णनात्मक सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा विचार सदर संशोधनात केलेला आहे.

**नमुना निवड :**

प्रस्तुत संशोधनकार्यासाठी 30 माध्यमिक शाळा नमुना गट म्हणून निवडला आहे. प्रस्तुत नमुना हा पुरेसा प्रातिनिधीक गट आहे असे म्हणता येते.

**संशोधनाची साधने :**

प्रस्तुत संशोधनकार्यासाठी प्रश्नावली, निरीक्षण व मुलाखती, मते या प्रकारची साधने वापरुन सामग्री संकलित करण्यात आलेली आहे.

**प्रश्नावली :** प्रस्तुत समस्येच्या अभ्यासासाठी प्रश्नावली या प्रमुख साधनाचा वापर करण्यात आलेला आहे.

**निरीक्षण :** महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक यांनी 15 शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन शाळांची पाहणी केली. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी यांच्याशी चर्चा करुन माहिती संकलित केली. शाळेत कोणकोणते उपक्रम राबविले जातात त्याचे निरीक्षण केले.

**मुलाखती, मते :** तज्ज्ञांच्या मुलाखती घेऊन किशोरावस्थेतील मुलांच्या समस्या व त्यावरील उपाययोजना यासंबंधी मते जाणून घेतली.

**निष्कर्ष :**

1) किशोरामध्ये अनेक शारीरिक समस्या आहेत. वयानुसार उंची न वाढणे यात 80% शाळांमध्ये ही समस्या प्राधान्याने दिसते. मुलांचे आरोग्य निरोगी कसे राहील याबाबत शिक्षक व समाजातून पालकांना मार्गदर्शन होतांना दिसत नाही.

2) किशोरावस्थेत वयानुसार वजन न वाढणे यात 86% शाळांमध्ये ही समस्या जाणवली आहे.

3) क्रीडा व व्यायाम तासिकेची उपेक्षा, आरोग्य तपासणी न होणे यामुळे समस्या निर्माण होतात असे दिसते.

4) किशोरावस्थेत चेहऱ्यावर तारुण्यपिटीका येणे, त्या फुटणे, काळे डाग पडणे या नैसर्गिक बाबींची मुलांना जाणीव करुन दिली जात नाही.

5) जनेनंद्रियाची पक्वता, दाढी मिशांची लक्षणे, त्या फुटणे, आवाजाला कंठ फुटून आवाज घोगरा होणे, स्तनाची वाढ होणे, छाती भरदार होणे या लक्षणांची जाणीव विद्यार्थ्यांना होते. मात्र बहूतेक शाळांमध्ये यासंबंधी शास्त्रशुध्द जाणीव करुन दिली जात नाही.

6) किशोरावस्थेतील मुलांना लैंगिक शिक्षण देणे आवश्यक आहे याबाबत शाळांची उदासिनता दिसून येते.

7) किशोरावस्थेच्या कालखंडात मुले भावनाक्षम बनलेले असतात. शाळांमधील वर्गात विद्यार्थी संख्या जास्त असल्याने शिक्षकांकडून, समवयस्कांकडून उपेक्षा होते. भावना दडपण्याचा परिणाम म्हणून ते उदासवाणे चेहरा करुन बसतात. 84% शाळांमध्ये ही समस्या आढळून येते.

8) किशोरावस्थेच्या मुलांमध्ये चंचलता दिसून येते. क्षणात खेळकरपणा तर क्षणात हिरमुसणे तर क्षणात उत्साह तर क्षणात निरुत्साह असतो. किशोरावस्थेतील भावनिक परिवर्तन 86% शाळांमध्ये दिसून येते.

9) व्यक्तिमत्व विकासासाठी भावनिक समायोजन महत्त्वाचे असते. त्यासाठी मुलांच्या मनातून भय, चिंता यांचा ऱ्हास झाला पाहिजे याची बहूतेक शाळांना जाणीव आहे.

10) किशोरावस्थेतील मुलांमध्ये भिन्न लिंगी व्यक्तीबद्दल आकर्षण निर्माण होते. नमुना गटातील 86% शाळांमध्ये असे वर्तन घडलेले दिसते.

11) किशोरावस्थेतील मुलांमध्ये शारीरिक बदल होतात त्यामुळे मुले हळवे बनतात, लाजतात हे प्रमाण 82% शाळांमधील विद्यार्थ्यांचे आहे.

12) किशोरावस्थेच्या मुलांमध्ये आनंद, उत्साह, राग, लोभ, तिरस्कार या भावना तीव्र स्वरुपाच्या असतात असे 90% शाळांनी नोंदविले आहे.

13) काम प्रवृतीचा विकास, समवयस्कांचा गट विघातक कार्यात वाया जाऊ नये, गटाचे विधायक कार्यात व कृतीमध्ये रुपांतर व्हावे यासाठी कार्यक्रमांचे आयोजन अल्प शाळांमध्ये होते. चोऱ्या करणे, मारामाऱ्या करणे, नशा करणे, विध्वसंक कृती करणे या स्वरुपाची लक्षणे 74% शाळांमध्ये दिसून येते.

14) किशोरावस्थेतील विद्यार्थ्यांमध्ये काही प्रमाणात व्यसने किंवा सवयी दिसून येतात. त्यामध्ये चुईंगम खाणे, गुटखा खाणे, तंबाखू खाणे, सुपारी खाणे, मिश्री लावणे ही व्यसने आहेत. या व्यसनावर नियंत्रण मिळविण्यासाठी शाळा उद्बोधन करणे, व्याख्यान देणे, मत परिवर्तन करणे, शिक्षा करणे यासारखे उपक्रम राबवितात.

15) किशोरावस्थेतील मुले नियमित वेळेवर गृहपाठ करीत नाहीत. गृहपाठ न करण्याची समस्या 76% शाळांमधून दिसून येते.

16) अध्यापन कार्याच्या संदर्भात शाळांना काही समस्या दिसून येतात. त्यामध्ये भाषा उच्चारात, लेखनात अशुध्दता, बोली भाषेचा प्रभाव, अचूक वाचन करता न येणे, शाळेत गैरहजर राहणे, गृहपाठ वेळेवर न करणे, पाढे पाठ नसणे.

17) काही शाळांमध्ये भौतिक सुविधांचा अभाव दिसून येतो. शाळेची अपुरी इमारत, वर्ग खोल्यांची कमतरता, मुलभूत सेवांचा अभाव, वीजेचा वेळेवर अभाव, शिक्षकांची कमतरता यासारख्या समस्या काही शाळांना आहेत.

18) किशोरांच्या समस्या सोडविण्यासाठी बहुतेक शाळा विविध मार्गांचा अवलंब करतात. त्यामधून राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्र प्रेम, सहिष्णूता, सहकार्यवृत्ती, विविध मूल्यांची जपणूक शाळांमधून होतांना दिसते.

19) किशोरांच्या विविध समस्या शाळांमधून समजून घेतल्या जात नाही. समस्या सोडविण्यासाठी शास्त्रशुध्द मार्गाचा अवलंब केला जात नाही. शाळांनी यावर गांभीर्याने व जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची गरज आहे.

**शिफारशी :**

किशोरावस्थेतील मुलांच्या समस्या शाळा, पालक व शासनाने गांभीर्याने विचारात घेऊन त्या सोडविणे आवश्यक आहे. प्रस्तुतच्या कर्यातुन जे निष्कर्ष आलेले आहेत त्याद्वारे काही शिफारशी सुचविलेल्या आहेत.

**शाळांसाठी सूचना व शिफारशी :**

1) शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक यांनी विद्यार्थ्यांशी चर्चा करुन समस्यांचा शोध घेतला पाहिजे. त्या समस्या कशा पध्दतीने सोडविता येईल याचा विचार करावा.

2) मुलांच्या विविध प्रकारच्या समस्या असतात त्या समस्यांवर शास्त्रीय पध्दतीने माहिती मिळवून उपचारात्मक कार्यक्रमाचे आयोजन करावे.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – VI April 2016

3) किशोरांच्या समस्या विद्यार्थ्यांच्या पालकांपर्यंत पोहोचवून त्या समस्या पालकांनी कशा सोडविल्या? कोणत्या उपाय योजना केल्या याबाबत नोंदी ठेवाव्यात.
4) विद्यार्थ्यांचे शारीरिक आजार कोणते? विद्यार्थी शाळेत गैरहजर का राहतो? शालेय कार्य वेळेवर पूर्ण का करीत नाही याचे निदान करणे आवश्यक आहे.
5) शाळेच्या मुख्याध्यापकांनी मानसशास्त्रतज्ज्ञ शिक्षकांची नेमणूक करुन किशोरांच्या समस्येचे कार्य पूर्ण करावे.
6) शिक्षकांनी आपले अध्यापन प्रभावी व परिणामकारक करावे जेणेकरुन विद्यार्थ्यांची अध्यापनातील अभिरुची वाढण्यास मदत होईल.
7) शाळांनी शिक्षक-पालक संघ, पालक सभा, पालक मेळावे, पालकांच्या वैयक्तिक भेटी घ्याव्यात.
8) शाळेने विद्यार्थ्यांमध्ये जीवनमूल्ये, नैतिक मूल्ये, सामाजिक मूल्ये रुजविण्याचे प्रयत्न करावे.
9) शाळांनी विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक विकासावर अधिक भर द्यावा.
10) शाळांनी विद्यार्थ्यांकडून शालेय कामकाज योग्यवेळी व काटेकोरपणे करुन घ्यावे. गृहपाठ व इतर कार्य वेळीच तपासावेत.

**पालकांसाठी सूचना व शिफारशी :**

1) पालकांनी पालक सभा, पालक मेळावे यासाठी नियमितपणे उपस्थित राहावे. आपल्या पाल्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत.
2) पालकांनी आपल्या पाल्यांना समजून घेऊन त्यांच्या मानसिकतेचा, भावनिकतेचा विचार करावा. पाल्यांना विश्वासामध्ये घेऊन त्यांच्याशी मित्रत्वाच्या भावनेने वागावे.
3) पालकांनी पाल्याच्या अडचणी, शैक्षणिक समस्या समजून घेण्यासाठी शाळांच्या माध्यमातून समस्या सोडविण्याचा प्रयत्न करावा.
4) पालकांनी शाळा आपली आहे, शाळेला सहकार्य करावे, पाल्यांना दररोज नियमित व वेळेत शाळेत पाठवावे.

**शासनासाठी सूचना व शिफारशी :**

1) किशोरावस्थेच्या समस्या शोधण्याची व त्या सोडविण्यासाठी उपाय करण्याची सुविधा उपलब्ध करुन द्यावी.
2) शासकिय अधिकाऱ्यांनी शाळेला वारंवार भेटी देऊन शालेय उपक्रम यांची माहिती घेऊन समस्यांचे निराकरण करावे.

3) शाळेला आवश्यकतेनुसार अनुदान व निधी उपलब्ध करुन देणे.
4) शिक्षक व मुख्याध्यापक यांनी शासकीय पातळीवर मुलांच्या समस्यांची गांभिर्याने जाणीव करुन द्यावी.
5) शालेय अभ्यासक्रमामध्ये आरोग्य शिक्षण, लैंगिक शिक्षण, लोकसंख्या शिक्षणाची सोय करावी.

**संदर्भ ग्रंथ :**

1. बोरुडे, कुमठेकर, देसाई, गोळविलकर (1990), **वैकासिक मानसशास्त्र,** पुणे : पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन.
2. वा.ना. दांडेकर, (2000), **शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र,** पुणे : श्रीविद्या प्रकाशन.
3. डी.आर. कुलकर्णी, (2009), **प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र,** नागपूर : विद्या प्रकाशन.
4. पाटणकर ना.वि., (1974), **लैंगिक शिक्षण,** पुणे : श्रीविद्या प्रकाशन.
5. जोशी आनंद, शिधये श्रीराम, (1998), **एड्सचा भोवरा,** पुणे : राजहंस प्रकाशन.
6. एड्स प्रतिबंध शिक्षण कार्य पुस्तिका, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था.